महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
मुख्य इमारत, अभिलेख कक्ष, कक्ष क्र. २२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई -४०००३२
दुरध्वनी क्र. ०२२ - २२०२ ५६०७ Email ID : tcacul१.mc-mh@gov.in

क्रमांक: गोचिन -२०२६/प्र.क्र.८५/ सां.का. १ दिनांक : ०३ जुलै, २०२६

प्रति,

सह / उप सचिव (आस्थापना)
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

**विषय :** महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव, मुंबई येथील मुख्य प्रशासकीय अधिकारी हे पद प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत

**संदर्भ :** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही २०११/ प्र.क्र.१३७/ का.१२, दि. १७/१२/२०१६.
२) या विभागाचे समक्रमांकाचे दि.०६/०५/२०२६ रोजीचे पत्र.
३) या विभागाचे समक्रमांकाचे दि.१०/०६/२०२६ रोजीचे पत्र.

राज्य शासनाच्या विविध विभागात विभागाच्या अधिपत्याखालील मंडळे/ महामंडळातील पदांवर संबंधित प्रशासकीय विभागाकडून प्रतिनियुक्तीने करावयाच्या नियुक्त्यांबाबतचे धोरण सामान्य प्रशासन विभागाने संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये जाहीर केलेले आहे.

०२. सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव, मुंबई या कार्यालयातील मुख्य प्रशासकीय अधिकारी हे पद प्रतिनियुक्तीने भरावयाचे आहे. सदर पदावर प्रतिनियुक्तीने जाण्याकरीता इच्छूक असलेल्या आपल्या विभागातील/ आपल्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांची नावे या विभागास जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत ई-मेलद्वारे/ प्रत्यक्षपणे निश्चितपणे प्राप्त होतील अशा रितीने पाठविण्याबाबत संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये सुचित करण्यात आले होते. तसेच तद्नंतर संदर्भ क्र.३ अन्वये जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत ई-मेलद्वारे/ प्रत्यक्षपणे निश्चितपणे प्राप्त होतील अशा रितीने पाठविण्याबाबत सुचित करण्यात आले होते. सदर जाहिरातीस **दि.१० जुलै, २०२६ पर्यंत** मुदतवाढ देण्यात येत आहे.

०३. सबब, मुख्य प्रशासकीय अधिकारी या पदावर प्रतिनियुक्तीसाठीचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | पदनाम | पदस्थापनेचे ठिकाण | वेतनश्रेणी (सातव्या वेतन आयोगानुसार) | ज्या संवर्गातून पद भरावयाचे आहे त्या संवर्गाची नांवे |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | मुख्य प्रशासकीय अधिकारी | महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव, मुंबई | किमान वेतन श्रेणी एस-२३, रुपये ६७७००-२०८७०० | मंत्रालयीन विभागातील अवर सचिव किंवा समतुल्य वेतनश्रेणी मधील समान वेतनबँड व ग्रेड पे च्या पदावरील अधिकारी. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दि.१७ डिसेंबर, २०१६ मधील नमूद अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे. |

**०४.** तरी, सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, सदर पदावर प्रतिनियुक्तीने जाण्याकरीता इच्छूक असलेल्या आपल्या विभागातील/ आपल्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांची नावे त्यांच्या मागील पाच वर्षाच्या गोपनीय अहवालांसह, वैयक्तिक माहिती व ना-विभागीय चौकशीचे प्रमाणपत्र इ. माहिती संदर्भाधीन शासन निर्णय दि.१७ डिसेंबर, २०१६ मधील तरतूदीनुसार सदर अधिकारी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यास पात्र आहे किंवा कसे याबाबतची माहिती सोबतच्या विहित करण्यात आलेल्या विवरणपत्रामध्ये या विभागाकडे **दि.१० जुलै, २०२६** पर्यंत ई-मेलद्वारे/ प्रत्यक्षपणे निश्चितपणे प्राप्त होतील अशा रितीने कृपया पाठवावीत.

**०५.** इच्छूक अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीसाठी निवड झाल्यास त्यांना संबंधित विभाग कार्यमुक्त करेल किंवा कसे याबाबतही कृपया अभिप्राय द्यावेत. आपल्या विभागातून प्रतिनियुक्तीसाठी कोणीही अधिकारी इच्छूक नसल्यास, निरंक असेही कृपया कळविण्यात यावे. एकदा निवड झालेल्या अधिकाऱ्याला त्याचे नाव मागे घेता येणार नाही.

**०६.** तसेच, सर्व प्रशासकीय विभागांना विनंती करण्यात येते की, सदर पत्र त्यांच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या वर नमूद केलेल्या संवर्गातील सर्व अधिकारी यांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

**(सुमंत दि.पाष्टे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

सोबत :- वरीलप्रमाणे
प्रत: निवडनस्ती (सां.का.१)

# विवरणपत्र

## महाराष्ट्र चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव , मुंबई येथील मुख्य प्रशासकीय अधिकारी हे पद प्रतिनियुक्तीने भरण्यासंदर्भात इच्छूकता मागविण्यासाठी विहित करण्यात आलेला नमुना

| | | |
|---|---|---|
| १ | अधिकाऱ्याचे संपूर्ण नांव | |
| २ | पदनाम/ संवर्ग<br>पदाची वेतनश्रेणी | |
| ३ | सध्याच्या कार्यालयाचे नांव व पत्ता व दूरध्वनी क्रमांक | |
| ४ | जन्म दिनांक | |
| ५ | शैक्षणिक अर्हता | |
| ६ | भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ७ | ज्या पदावर प्रतिनियुक्तीवर जाण्यास इच्छूक आहे ते पद | |
| ८ | मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या छायाप्रती (मूळ गोपनीय अहवाल पाठवू नयेत) | |
| ९ | संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी सुरु अथवा प्रस्तावित आहे किंवा कसे? तसेच, त्यांच्याविरुध्द भ्रष्टाचार / लाचलुचपत गुन्ह्यासंदर्भातील प्रकरण, फौजदारी प्रकरण प्रलंबित आहे किंवा कसे, | |
| १० | संबंधित अधिकाऱ्याची निवड झाल्यास त्यास तात्काळ कार्यमुक्त करण्यात येईल किंवा कसे- | |
| ११ | संबंधित अधिकारी कार्यरत असलेल्या संवर्गामध्ये अर्ज अग्रेषित करण्याच्या दिनांकास १०% पेक्षा अधिक पदे रिक्त आहेत किंवा कसे, | |
| १२ | शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.१७.१२.२०१६ व दि.१६.०२.२०१८ मधील तरतूदीनुसार सदर अधिकारी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यास पात्र आहे किंवा कसे, | |